1) शेळीपालन व्यवसाय सुरू करतांना साधरण किती खर्च येतो?

25 मादी व 2 बोकड असा कळप ठेवायचा असेल तर जमिनीची किंमत वगळता, घर, खाद्य, शेळयांची खरेदी याला अंदाजे रूपये 250000 खर्च येतो.

2) शेळीचे खरेदी करते वेळी शेळीचे वय किती असावे?

मादी – 1 वर्ष पूर्ण असलेली (गाभण असावी) व

नर – 2 वर्ष पुर्ण असलेला असावा.

3) दुधाळ म्हशी व गाईच्या जास्त दुध देणाऱ्या जाती कोणत्या?

म्हशीमध्ये मुऱ्हा, म्हैसाना व गाईमध्ये संकरीत गाई व होस्टेन या जास्त दुध देण्यासाठी प्रसिद्ध आहेत.

4) 100 शेळयांच्या कळपासाठी किती जागा लागते?

100 शेळयांचा कळप पाळण्यासाठी 4 ते 5 एकर जमिन हिरवा चारा उगवण्यासाठी व साधारण ½ एकर जमिन गोठाबांधण्यासाठी लागते.

5) दुधाळ जनावरांची घरे कशा पद्धतीची असावीत?

दुधाळ जनावरांसाठी मुक्त गोठा पद्धती खूप प्रचलित आहे. हया पद्धतीमुळे जनावरांची दुध देण्याची क्षमता वाढते. असे सिद्ध झाले आहे की, जनावरांना बांधुन किंवा कोंडुन ठेवल्यास त्यांचा तणाव वाढतो व दुध देण्याची क्षमता कमी होते. तसेच पावसाळयामध्ये अर्धबंदिस्त गोठे असावे.

6) गाई व म्हशीचे खरेदीच्या वेळीचे वय किती असावे?

गाईचे वय साधारण – 2 ते 2.5 वर्ष असावे व

म्हशीचे वय साधारण – 3 ते 3.5 वर्ष असावे.

7) शेळीला दर दिवसाला किती खाद्य लागते?

वयात आलेली शेळी दर दिवसाला 4 ते 5 किलो हिरवा चारा व 200 ते 250 ग्रॅम खुराक लागतो.

8) शेळीचे वय कसे ओळखावे?

एक वर्ष पुर्ण झालेल्या शेळीच्या खालच्या जबडयात दोन पक्के दात येतात ते पिवळसर, बोथट, लांबलचक असतात. साडे तीन ते चार वर्ष पुर्ण झालेल्या शेळीचे चार दात पुर्ण आलेले असतात.

9) 10 लिटर दुध देणाऱ्या जनावरांना साधारण किती खाद्य लागते?

10 लिटर दुध देणाऱ्या जनावरांना प्रति दिवसाला 15 ते 20 किलो हिरवा चारा, 4 ते 5 किलो सुका चारा व 4 ते 5 किलो खुराक लागतो.

10) शेळी, गाई व म्हशी यांचा गाभण काळ किती महिन्यांचा असतो?

शेळीचा गाभण काळ 150– 155 दिवसांचा, गाईचा गाभण काळ 280 दिवसांचा तर म्हशीचा गाभण काळ 310 दिवसांचा असतो.

11) महाराष्ट्रामध्ये शेळी व्यवसायासाठी कुठली जात निवडावी?

महाराष्ट्रामध्ये शेळी व्यवसाय मटणासाठी करावयाचा असल्यास उस्मानाबादी व सिरोही ही जात निवडावी. सिरोही जातीच्या शेळीला मुंबई सारख्या ठिकाणी बकरी ईदला चांगली मागणी असते.

12) कोणत्या चारापिकाची लागवड जनावरांसाठी करावी?

जनावरांसाठी DHN-6, गजराज, यशवंत, Co-4, मका, लुसर्न, बरसीम, पॅराग्रासची लागवड करावी, ही चारापिके चवदार व पौष्टीक आहेत.

13) शेळयांना कोणते लसीकरण करणे गरजेचे आहे?

शेळयांसाठी PPR, FMD, HS, BQ, ET, CCPP या साथीच्या रोगांसाठी लसीकरण करूण घ्यावे.

14) निरोगी जनावर कसे ओळखावे?

निरोगी जनावराच्या त्वच्चेवर चकाकी/चमक असते, नागपुटया ओलसर, डोळे पाणीदार व त्यातून कुठलाही स्त्राव येऊ नये, कान तीक्ष्ण असावेत व त्यातून कुठलाही स्त्राव बाहेर येतांना दिसू नये, शेपटीच्या आजूबाजूला घाण (शेण) वैगरे नसावे.

15) मुक्त गोठा पद्धतीमध्ये एका गाय/म्हैसीला किती जागा लागते?

मुक्त गोठा पद्धतीमध्ये एका गाय/म्हैसीला 120 चौ.फुट. जागा लागते.

16) मुक्त गोठा पद्धतीमध्ये एका शेळीला किती जागा लागते?

मुक्त गोठा पद्धतीमध्ये एका शेळीला 12 चौ.फुट. जागा लागते.

17) पावसाळी भागासाठी शेळीच्या घराची रचना कशी असावी?

पावसाळी भागात शेळीची घरे उंचावर बांधावीत, यालाच ''रेज्ड प्लॅटफॉर्म''(उंचावर) पद्धती असेही म्हणतात. ही घरे जमिनीपासुन 3.5 फुटाच्या उंचीवर बांधतात व त्यावर लाकडी फळयांचा माळ तयार करून घेतात जेणे करून मलमुत्र खाली जमा होते व वरची जागा कोरडी राहते. खालचे मलमुत्र वारंवार काढावे.

18) वर्षभर चारा उपलब्ध व्हावा यासाठी काय करावे?

वर्षभर जनावरांना चारा उपलब्ध करूण ठेवण्यासाठी 'मुरघास' (Silage) बनवून ठेवावा.

19) मुरघास म्हणजे काय? मुरघास कसे तयार करावे? मुरघास बनविण्याच्या पद्धती व चांगला मुरघास कसा ओळखवा?

हिरव्या चाऱ्याची कुट्टी करून हवाबंद स्थितीत 40 दिवस साठवून ठेवल्यास तयार होणाऱ्या खद्यास 'मुरघास' असे म्हणतात.

फुलोऱ्यात आलेले हिरवे गवत कापावे, त्यानंतर 1 ते 1.5 इंचाची कुट्टी करून ती कुट्टी एका थरानंतर दुसरा थर असे टाकुण दाबुन त्याला हवाबंद स्थितीत ठेवण्यासाठी तुडवून घ्यावे, त्यात लॅक्टोबॅसीलस नावाचे कल्चर मिश्रीत करून बंद सायलोपिट किंवा पिंपामध्ये भरावे व 35 ते 40 दिवसांनी उघडावे.

मुरघास छोटे प्लॅस्टीकचे पिंप, प्लॅस्टीकच्या पिशव्या, बांबुचे बंकर, सायलो पिठ, इ. मध्ये साठविता येतो. चांगल्या प्रतिचे मुरघास गोड–आंबट वास असणारे, पिवळसर–सोनेरी रंगाचे असते. मुरघास उघडल्यानंतर 4 ते 5 दिवसात वापरावा म्हणजे त्याची चव टिकुन राहते.

20) सिरोही शेळया मिळण्याचे ठिकाण?

राजस्थान मधील सिरोही व आसपासच्या गावामध्ये, गावातील बाजार पेठेत हया शेळया मिळू शकतात.

21) नवजात वासराला किती दिवस मातेचे चिक पाजावे?

नवजात वासराला मातेचा चिक वासराच्या वजनाच्या 1/10 पट ऐवढा 3 दिवस देणे आवश्यक आहे.

22) नर वासरू शेतात कामासाठी वापरायचे असेल तर काय करावे?

नर वासरू शेतात कामासाठी वापरायचे असेल तर त्याचे खच्चीकरण करावे, शास्त्रीय पद्धतीचे खच्चीकरण नर 1 वर्ष पुर्ण झाल्यावर करता येते.

23) जनावरांच्या खरेदीच्या वेळी कुठल्या रोगाची तपासणी करणे गरजेचे आहे?

जनावरांच्या खरेदीच्या वेळी 'ब्रुसेलोसिस' (Brucellosis)/गर्भपात, सांसर्गिक लाळया खुरकुत,स्तनदाह नावाच्या रोगाची लागण नसल्याचे तपासून घ्यावे.

24) मुरघास उघडल्यानंतर किती दिवसात वापरावे?

मुरघास उघडल्यानंतर 4 ते 5 दिवसात वापरावा म्हणजे त्याची चव टिकुन राहते.

25) शेळयामेंढयासाठी मुरघास वापरता येतो का?

शेळयामेंढया मुरघास आवडीने खातात.

26) 10 दुधाळ जनावरांच्या गोठयासाठी किती खर्च येतो?

मुक्त गोठा पद्धतीत रूपये 100000 पर्यंत तर बंधिस्त पद्धतीत 400000 ते 500000 रूपये खर्च येतो.

27) गाई व्यायल्यानंतर किती दिवस दुध देते?

गाई व्यायल्यानंतर 280–305 दिवस दुध देत.

28) गाई किंवा म्हशी व्यायल्यानंतर पुन्हा माजावर किती दिवसात येतात?

गाई किंवा म्हशी सर्वसाधारणपणे व्यायल्यानंतर 2 ते 3 महिन्यात पुन्हा माजावर येतात.

29) शेळया माजावर येण्याचा हंगाम कोणता आहे?

शेळया हिवाळयात माजावर येतात.

30) शेळी व गाईच्या वासराचे वजन किती असते?

शेळीच्या नवजात करडाचे वजन 2 ते 2.5 किलो तर गाईच्या नवजात वासराचे वजन 20 ते 25 किलो असते.

31) जनावरांच्या प्रक्षेत्रावर कोणत्या नोंदवहया असल्या पाहिजेत?

जनावरांच्या प्रक्षेत्रावर जनावरांच्या जन्म व मृत्यु याची नोंदवही, लसीकरण व उपचार याची नोंदवही, खाद्य नोंदवही, रोजचा जमा खर्च नोंदवही, दुधाळ जनावर असेल तर रोजचे दुध उत्पादन व विक्री याची नोंदवही, इ. नोंदवहया असणे आवश्यक आहे.

32) मादीमध्ये माजावर आल्याची लक्षणे कोणती?

मादी माजावर आल्यावर अस्वस्थ/बैचेन दिसते, वारंवार लघवी करते, खली–वर बसते उठते, दुसऱ्या मादी किंवा नरावर चढण्याचा प्रयत्न करते किंवा नराला चढु देते, भिंतीवर अंग घासते. तसेच गाइमध्ये हंबरण्याचे लक्षणे दिसतात.

33) बोकड किती वर्षाचा होईपर्यंत शेळी भरविण्यासाठी वापरता येतो?

बोकड वयाच्या 6 ते 8 वर्षापर्यंत शेळीला नैसर्गिक रित्या भरविण्यासाठी वापरता येऊ शकतो.

34) करडे किती वजनाचे झाले की विक्रीस काढावे?

करडे 8 ते 9 महिन्याचे झाल्यावर किमान 20 ते 25 किलो वजनाचे झाले की विक्रीस काढावे.

35) प्रक्षेत्रावर प्रथमोउपचारासाठी काय असावे?

प्रक्षेत्रावर प्रथमोउपचारासाठी आयोडीन, कापूस, बॅन्डेज, हगवणीच्या गोळया/औषधे, जंतनिर्मुलनाची औषधे, विविध ॲन्टीबायोटीक्स, इ. असावीत.

36) वासरातील जंतनिर्मुलन कसे करावे?

वासरात पातळ हगवण लागल्यास जंतनाशनाच्या गोळया डॉक्टरच्या सल्याने दयाव्या.

37) पाण्यातुन होणाऱ्या रोगप्रसारावर प्रतिबंध कसा करावा?

आठ दिवसाला पाण्याच्या टाक्या/हौद चुन्याच्या निवळीणे स्वच्छ करून घ्याव्यात.

# प्रशिक्षण घेतल्यानंतर यशस्वी शेळी व्यवसाय सुरू करणारे प्रशिक्षणार्थी

| अ.क. | प्रशिक्षनार्थीची नावे | प्रक्षेत्राचा पत्ता व दुरध्वनी क. | प्रशिक्षण घेतल्याचे वर्ष किंवा तारिख | व्यवसाय चालु केल्याचे बर्ष | जनावरांची संख्या | प्रशिक्षणार्थीने दिलेल्या माहितीनुसार वार्षिक नफा |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | श्री. राजेश मोरे | पत्ता – अइनावाडी, तालुका–खेड, जिल्हा–रत्नागिरी<br>दुरध्वनी क. 9920091878 | सप्टेंबर, 2011 | नव्हेंबर, 2011 | 70 | पहिल्यावर्षी – 1,30,000<br>दुसऱ्या वर्षी – 2,25,000 |
| 2 | श्री. पृथ्वीराज चव्हाण | पत्ता – विठ्ठलवाडी, पोस्ट–कौटे, तालुका–वाई, जिल्हा–सातारा<br>दुरध्वनी क. 9960548005 | 4 फेब्रुवारी, 2012 | 18 फेब्रुवारी, 2012 | 40 | पहिल्यावर्षी – 80,000 |
| 3 | श्री. रवी पालव | पत्ता –कोकण<br>दुरध्वनी क. 9833472544 | जुन, 2008 | 2008–20089 | 25 | 75,000 |
| 4 | श्री. दिलेर खान | पत्ता –अल्फाह गोटफार्म, कुचामन सिटी, राजस्थान<br>दुरध्वनी क . 9867899900 | 20 फेब्रुवारी, 2013 | 2012 | 140 | 2,00,000 |
| 5 | श्री. वसीम शहाबाझकर | पत्ता –जयपुर<br>दुरध्वनी क. 9819583499 | फेब्रुवारी, 2013 | 2011 | 1500 | 3,00,000 |
| 6 | श्री. तुषार पिसोळकर | पत्ता – बिड<br>दुरध्वनी क. 9768089913 | फेब्रुवारी, 2012 | एप्रिल, 2012 | 22+2 | खाद्याच्या अभावामुळे बंद करावा लागला व त्यांच्या शेळया दुसऱ्या शेळी पालकाला विक्री केल्या आहेत. |